# Maharashtra Board Solutions for Class 6- Marathi Sulabhbharati: Chapter 7- उद्यानात भेटलेला विद्यार्थी




For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-6-marathi-sulabhbharati-chapter-7-udyanat-bhetlela-vidyarthi/

IndCareer

# Maharashtra Board Solutions for Class 6- Marathi Sulabhbharati: Chapter 7- उद्यानात भेटलेला विद्यार्थी

Class 6: Marathi Sulabhbharati Chapter 7 solutions. Complete Class 6 Marathi Sulabhbharati Chapter 7 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 6- Marathi Sulabhbharati: Chapter 7- उद्यानात भेटलेला विद्यार्थी

Maharashtra Board 6th Marathi Sulabhbharati Chapter 7, Class 6 Marathi Sulabhbharati Chapter 7 solutions

**Questions and Answers**

***1.*** एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा***.***

प्रश्न अ**.**

चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी कशासाठी येत **?**

उत्तर:

चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी बाकावर बसून पुस्तक वाचण्यासाठी येत.

प्रश्न आ**.**

उद्यानात गुरुजींचे कोणाकडे लक्ष गेले**?**

उत्तर:

उद्यानात गुरुजींचे लक्ष थोड्या अंतरावर बसून पुस्तक वाचणाऱ्या विद्यार्थ्याकडे गेले.

प्रश्न इ**.**

गुरुजींना उद्यानात वाचन करत बसलेल्या विदयार्थ्यांची विचारपूस करावी असे का वाटले **?**

उत्तर:

गुरुजींना उद्यानात एक विद्यार्थी सलग तीन दिवस वाचन करत बसलेला दिसला. तो इतर मुलांसारखी मस्ती करताना दिसत नसे, म्हणून गुरुजींना त्याची विचारपूस करावी असे वाटले.

प्रश्न ई.

केळूस्कर गुरुजींची व डॉ. आंबेडकरांची गट्टी का जमली**?**

उत्तर:

केळूस्कर गुरुजी व डॉ. आंबेडकर यांची रोज उद्यानात भेट होऊ लागली. गुरुजी त्यांना चांगल्या लेखकांची पुस्तके वाचायला देऊ लागले, त्यामुळे दोघांची गट्टी जमली.

प्रश्न उ.

डॉ. आंबेडकरांनी कोणता नावलौकिक मिळवला**?**

उत्तर:

डॉ. आंबेडकरांनी मिळालेल्या उच्च शिक्षणाच्या संधीचे सोने करून, उच्चविद्याविभूषित होऊन, जगातील एक विद्वान म्हणून नावलौकिक मिळवला.

***2.*** खालील वाक्ये कोण***,*** कोणास व का म्हणाले ते लिहा***.***

प्रश्न अ.

“बाळ, तुझं नाव काय?”

उत्तर:

भीमराव रोज उदयानात पुस्तक वाचत असलेला पाहून गुरुजी भीमरावला म्हणाले.

प्रश्न आ.

“चांगली पुस्तके वाचली पाहिजेत.”

उत्तर:

भीमरावला अवांतर वाचनाची आवड असलेली पाहून गुरुजी भीमरावला म्हणाले.

प्रश्न इ.

"मला ती पुस्तके वाचायला आवडतील!"

उत्तर:

काही लेखकांची पुस्तके वाचायला देईन, असे गुरुजींनी सांगितल्यावर भीमराव गुरुजींना म्हणाले.

***3.*** *असे का घडले? ते लिहा.*

प्रश्न अ.

केळूस्कर गुरुजींच्या मनात उदयानात वाचत बसलेल्या विदयार्थ्याबाबत कुतूहल निर्माण झाले.

उत्तर:

उदयानात वाचत बसलेला विदयार्थी इतर मुलांसारखी मस्ती करताना दिसत नव्हता तर सतत तीन दिवस गुरुजी त्याला वाचन करताना पाहत होते. म्हणूनच त्यांच्या मनात या मुलाबद्दल कुतूहल निर्माण झाले.

प्रश्न आ.

भीमराव उदयानात वाचत बसायचे.

उत्तर:

भीमरावांना शाळेतील पुस्तकांशिवाय अवांतर पुस्तके वाचण्याची आवड होती म्हणून शाळा सुटल्यानंतर उदयानात काही वेळ पुस्तक वाचत बसायचे.

प्रश्न इ.

गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

उत्तर:

गुरुजी नेहमी भीमरावाला पुस्तके वाचायला देत. भीमरावच्या वाचनामुळे गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

प्रश्न ई.

गुरुजींनी भीमरावच्या डोक्यावरून हात फिरवला.

उत्तर:

भीमरावला वाचन कसे करावे हे गुरुजींनी समजाविले. काही लेखकांची पुस्तके वाचायला देईन असे जेव्हा गुरुजी म्हणाले तेव्हा भीमरावने वाचनाची तयारी दर्शवली. तेव्हा मायेने गुरुजींनी भीमरावच्या डोक्यावरून हात फिरवला.

प्रश्न उ.

गुरुजींनी भीमरावच्या उच्च शिक्षणासाठी शिफारस केली.

उत्तर:

केळूस्कर गुरुजींनी भीमरावची तल्लख बुद्धिमत्ताओळखून महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवण्यासाठी सयाजीराव गायकवाड महाराजांकडे शिफारस केली.

***4.*** पाठातील खालील घटना योग्य क्रमाने लिहा*.*

प्रश्न **1.**

पाठातील खालील घटना योग्य क्रमाने लिहा.

(अ) गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

(आ) गुरुजींनी विद्यार्थ्यांकडे फारसे लक्ष दिले नाही.

(इ) त्या विदयार्थ्यानेदेखील गुरुजींकडे बघितले.

(ई) डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.

(उ) गुरुजींनी भीमरावाला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.

(ऊ) गुरुजी मुलाजवळ आले.

उत्तरः

(अ) गुरुजींनी विदयार्थ्यांकडे फारसे लक्ष दिले नाही.

(आ) त्या विद्यार्थ्यानेदेखील गुरुजींकडे बघितले.

(इ) गुरुजींनी भीमरावाला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.

(ई) गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली

(उ) डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.

***5.*** खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा*.*

उदा., वाचनाला – वाचन, नाच, नाला, लावा, चना.

(अ) तुझ्याजवळ

(आ) दिवसापासून

(इ) मार्गदर्शन

(ई) आवडतील

**प्रश्न 1.**

**खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा.**

**उदा., वाचनाला – वाचन, नाच, नाला, लावा, चना.**

उत्तरः

1. वाचनाला – वाचला, नाच, नाला, लावा, चना
2. दिवसापासून – दिवसा, सून, पान, वसा, दिन, पाव, सासू
3. मार्गदर्शन – मार्ग, दर्श, दमा, दर्शन, मान
4. आवडतील – वड, आड, आव, आतील, लव
5. महाविद्यालयीन – मन, हाल, महाल, नदया, मल, विमल

***6.* खालील शब्दांचे वचन बदला*.***

**प्रश्न 1.**

**खालील शब्दांचे वचन बदला.**

(अ) लेखक

(आ) पुस्तक

(इ) शाळा

(ई) भेट

(उ) शिफारस

(ऊ) शब्द

उत्तरः

(अ) लेखक

(आ) पुस्तके

(इ) शाळा

(ई) भेटी

(उ) शिफारसी

(ऊ) शब्द

**7.** आंतरजालावरून खालील मुद्द्यांच्या आधारे डॉ**.** आंबेडकर यांची माहिती मिळवा व लिहा**.**

(अ) पूर्ण नाव

(आ) जन्म स्थळ

(इ) जन्म दिनांक

(ई) आई – वडिलांचे नाव

(उ) शिक्षण

(ऊ) लिहिलेली पुस्तके

(ए) कार्य

प्रश्न **1.**

आंतराजालावरून खालील मुद्द्यांच्या आधारे डॉ**.** आंबेडकर यांची माहिती मिळवा व लिहा**.**

उत्तर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर. रत्नागिरी जिल्ह्यात आंबवडे गावात दिनांक 14 एप्रिल 1891 साली त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव भीमाबाई व वडिलांचे नाव रामजी होते. त्यांनी एम.ए., पी.एच.डी. पर्यंत शिक्षण घेतलेच पण डी.एस.सी, एल.एल.डी., डी.लि.ट, बॅरिस्टर एंट लॉ. या पदव्याही प्राप्त केल्या. भगवान बुद्ध आणि धम्म, धर्मांतर कां? जातिप्रथेचे विध्वंसन, पुणे करार, शुद्र पूर्वी कोण होते, बुद्ध की कार्ल मार्क्स अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली.

हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती हे स्त्रीविषयक माहितीपर व माझी आत्मकथा हे व्यक्तिचित्रण ही त्यांनी लिहिले आहे. त्यांनी महाडच्या तळ्यातील पाणी अस्पृश्यांना खुले करून दिले. नाशिकच्या काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळवून दिला. 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' हा मुलमंत्र त्यांनी दलितांना दिला. त्यांना मरणोत्तर भारतरत्न' हा किताब भारत सरकारने बहाल केला.

**8.** खालील शब्द शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या**.**

(अ) शब्द – सुशब्द, अपशब्द.

(आ) स्पष्ट – सुस्पष्ट, अस्पष्ट.

(इ) बुद्धी – सुबुद्धी, बुद्धिमत्ता, बुद्धिमान, निर्बुद्ध, दुर्बुद्धी

**9.** खालील शब्द असेच लिहा**.**

उद्यान, हायस्कूल, मुख्याध्यापक, विद्याव्यासंगी, विद्यार्थी, तिसऱ्या, दुसऱ्या, सर्वसामान्य, निश्चित, मार्गदर्शन, पद्धतशीर, विस्तृत, अभेद्य, गट्टी, तल्लख, बुद्धिमत्ता, महाविद्यालयीन, शिक्षण, स्वतः, विद्वान, प्राप्त, व्रात्य, विद्याविभूषित, उच्च, स्वतंत्र.

उपक्रम: वेगवेगळ्या वृत्तपत्रांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आलेल्या माहितीची कात्रणे गोळा करा व वहीत चिकटवा. त्याचे वाचन करा.

**सांगा पाहू.**

कधी हातावर, कधी भिंतीवर
जाऊन मी बसतो,
तीन हात माझे सतत
फिरवत मी असतो,
वेळ वाया घालवू नका
असा नेहमी उपदेश करतो.

शिस्तीचे धडे
उत्तम गडे,
कणकण शोधते
कधीच न रडे.

सांगा पाहू.

प्रश्न 1.

कधी हातावर, कधी भिंतीवर जाऊन मी बसतो, तीन हात माझे सतत फिरवत मी असतो, वेळ वाया घालव नका असा नेहमी उपदेश करतो

उत्तर:

घड्याळ

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-6-marathi-sulabhbharati-chapter-7-udyanat-bhetlela-vidyarthi/

IndCareer

प्रश्न **2.**

शिस्तीचे धडे, उत्तम गडे, कणकण शोधते, कधीच न रडे

उत्तर:

मुंगी

**Important Additional Questions and Answers**

चूक की बरोबर ते लिहा.

प्रश्न **1.**

चूक की बरोबर ते लिहा.

1. चर्नी रोड उद्यानात सायंकाळच्या वेळी अनेक नागरिक फिरायला यायचे.
2. गुरुजी सोबत आणलेले वर्तमानपत्र वाचत.
3. भीमरावाला अवांतर पुस्तके वाचनाची आवड होती.
4. इतर मुलांसारखा भीमरावही मस्ती करीत होता.
5. गुरुजींनी भीमरावला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.

उत्तर:

1. बरोबर
2. चूक
3. बरोबर
4. चूक
5. बरोबर

खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

प्रश्न **1.**

चर्नीरोड उद्यानात सायंकाळी कोण कोण येत**?**

उत्तर:

चर्नीरोड उदयानात सायंकाळी अनेक नागरिक फिरायला येत. तसेच विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि विदयाव्यासंगी लेखक केळूस्कर गुरुजी व भीमराव येत असत.

प्रश्न **2.**

भीमरावांनी स्वत:बद्दलची कोणती माहिती गुरुजींना सांगितली?

उत्तर:

भीमराव एलफिन्स्टन हायस्कूल, भायखळा येथे शिकत आहेत. शाळेतील पुस्तकांशिवाय अवांतर पुस्तके वाचण्याची त्यांना आवड आहे व शाळा सुटल्यानंतर ते चर्नी रोड उदयानात काही वेळ पुस्तक वाचत बसतात ही माहिती भीमरावांनी गुरुजींना सांगितली.

प्रश्न **3.**

भीमरावांनी संधीचे सोने कसे केले?

उत्तर:

आपल्या तल्लख बुद्धिमत्तेने, वाचनाने व कष्टाने ते जगातील एक विद्वान म्हणून नावलौकिक प्राप्त करणारे उच्च विदयाविभूषित डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले. त्यांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली. अशाप्रकारे भीमरावांनी संधीचे सोने केले.

व्याकरण व भाषाभ्यास

प्रश्न **1.**

खालील शब्दांचे वचन बदला.

1. संधी
2. महाविदयालय
3. विद्वान
4. विदयार्थी

उत्तर:

1. संधी
2. महाविदयालये
3. विद्वान
4. विदयार्थी

खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.

प्रश्न **1.**

बाळ तुझं नाव काय.

उत्तर:

"बाळ तुझं नाव काय?"

**प्रश्न 2.**

वा छान नाव आहे तुझं.

उत्तर:

"वा! छान नाव आहे तुझं!"

**प्रश्न 3.**

जरुर दया गुरुजी मला ती पुस्तके वाचायला आवडतील.

उत्तर:

"जरुर दया गुरुजी! मला ती पुस्तके वाचायला आवडतील!"

**प्रश्न 4.**

खालील शब्दांचे लिंग बदला.

1. मुख्याध्यापक
2. विदयार्थी
3. बालक
4. माता
5. महाराजा
6. विद्वान
7. शिक्षक
8. लेखक
9. मित्र

उत्तर:

1. मुख्याध्यापिका
2. विद्यार्थिनी
3. बालिका
4. पिता
5. महाराणी
6. विदूषी
7. शिक्षिका
8. लेखिका
9. मैत्रिण

खालील वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

**प्रश्न 1.**

कुतूहल निर्माण होणे – जिज्ञासा निर्माण होणे.

उत्तर:

शास्त्रीय प्रयोगामुळे विदयार्थ्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले.

**प्रश्न 2.**

संधीचे सोने करणे – वेळेचा सदुपयोग करणे

उत्तर:

अपार कष्टाने डॉ. रघुनाथ माशेलकरांनी संधीचे सोने केले.

**प्रश्न 3.**

नावलौकिक मिळवणे – प्रसिद्धी मिळवणे

उत्तर:

गायनामुळे लता मंगेशकरने नावलौकिक मिळवला.

लेखन विभाग:

सांगा पाहू.

**प्रश्न 1.**

भिंतीवर चढतो, खाली पडतो प्रयत्नांची पराकाष्ठा करतो. जाळे विणतो, हार न मानतो.

उत्तर:

कोळी

पाठ परिचयः



प्रस्तुत पाठात बालपणी डॉ. भीमराव आंबेडकरांना वाचनाची किती आवड होती व त्यांचा हा वाचननाद केळूस्कर गुरुजींनी कसा ओळखला याचे वर्णन केले आहे. पुढे त्यांच्या मार्गदर्शनाने व शिफारसीने भीमराव उच्च शिक्षण घेऊ शकले व उच्च विद्याविभूषित होऊन स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहू शकले, 'वाचाल तर वाचाल' हे किती सार्थ आहे हे या पाठातून कळते.

शब्दर्थ:

1. उदयान – बाग (garden)
2. सायंकाळ – संध्याकाळ (evening)
3. नागरिक – रहिवासी (citizen)
4. विदयाव्यासंगी- अभ्यासाची आवड असणारे (studious)
5. बाक – बसण्याची जागा (bench)
6. कुतूहल – जिज्ञासा (curiosity)
7. आपुलकीने – आपलेपणाने (affectionately)
8. आदर – सन्मान (respect)
9. आतुरता – उत्सुकता (excitement, eagerness)
10. विस्तृत – अफाट, मोठे (vast)
11. अभेदय – तोडता न येणारी (imperitrable)
12. तल्लख – तीक्ष्ण (sharp)
13. गट्टी – मैत्री, दोस्ती (friendship)

14. शिफारस – नाव सुचविणे (recommendation)
15. नावलौकिक – प्रसिद्धी (fame, popularity)
16. राज्यघटना – संविधान (constitution)

वाक्प्रचार व अर्थ:

1. कुतूहल निर्माण होणे – जिज्ञासा निर्माण होणे
2. संधीचे सोने करणे – वेळेचा सदुपयोग करणे
3. नावलौकिक मिळवणे – प्रसिद्धी मिळवणे

# Maharashtra Board Solutions Class 6 Marathi


- Chapter 1- भारतमाता
- Chapter 2- माझा अनुभव
- Chapter 3- पाऊस आला! पाऊस आला!
- Chapter 4- माहिती घेऊया
- Chapter 5- सुगरणीचे घरटे
- Chapter 6- हे खरे खरे व्हावे
- Chapter 7- उद्यानात भेटलेला विद्यार्थी
- Chapter 8- कुंदाचे साहस
- Chapter 9- घर
- Chapter 10- बाबांचं पत्र
- Chapter 11- मिनूचा जलप्रवास
- Chapter 12- चंद्रावरची शाळा
- Chapter 13- मोठी आई
- Chapter 14- अप्पाजींचे चातुर्य
- Chapter 15- होळी आली होळी
- Chapter 16- मुक्या प्राण्यांची कैफियत
- Chapter 17- पाणपोई

# About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here. You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com